डन्नोचे साहस

निकोलाई नोसोव्ह

# डन्नोने घेतले संगीताचे धडे

02

# डन्नोचे साहस

## निकोलाई नोसोव्ह

02

# डन्नोने घेतले संगीताचे धडे

रेखाचित्रे: बोरिस कलाउशिन

मराठी: अश्विनी बर्वे

डन्नो कधीच काहीही धड करू शकला नाही. तो अक्षरांच्या गटानुसार वाचण्यापलीकडे कधीच जाऊ शकला नाही, आणि त्याला फक्त छापील अक्षरेच लिहिता येत होती. काही लोक म्हणायचे की त्याचे डोके रिकामे होते, पण ते खरे नव्हते, कारण जर त्याचे डोके रिकामे असते तर तो अजिबात विचार करू शकला नसता. खरे तर, तो फारसा विचार करत नसे, पण तो आपले बूट पायात घालायचा, डोक्यात नाही, आणि तसे करण्यासाठी सुद्धा बराच विचार करावा लागतो.

तरीसुद्धा तो काही वाईट माणूस नव्हता. त्याला शिकायचे होते, पण त्याला काम करायचे नव्हते. त्याला प्रयत्न न करता शिकायचे होते, आणि अर्थातच, माइट्समधील सर्वात हुशार व्यक्तीलाही ते जमले नसते.

माईट्स मुले आणि माईटस मुली यांना संगीताची खूप आवड होती, आणि ट्रिल्स एक उत्तम संगीतकार होता. त्याच्याकडे सर्व प्रकारची वाद्ये होती आणि तो ती नेहमी वाजवत असे. लोक त्याच्या वादनाबद्दल त्याची खूप प्रशंसा करत. यामुळे डन्नोला मत्सर वाटू लागला, आणि एके दिवशी तो त्याला म्हणाला:

“मला वाजवायला शिकवा, मलाही संगीतकार व्हायचं आहे.”

“ठीक आहे,” ट्रिल्स म्हणाला. “तुला कोणते वाद्य वाजवायचे आहे?”

“कोणते सोप्पे आहे?”

“बालालैका.”

“ते मला द्या, मी ते वापरून पाहीन.”

ट्रिल्सने त्याला एक बालालैका दिली. डन्नोने ती थोडी वाजवली आणि मग म्हणाला: “याचा आवाज पुरेसा येत नाही. मला यापेक्षा मोठा आवाज असलेलं काहीतरी दे.”

ट्रिल्सने त्याला एक व्हायोलिन दिले. डन्नोने थोडा वेळ ते वाजवण्याचा प्रयत्न केला आणि मग म्हणाला:

“तुमच्याकडे यापेक्षा मोठया आवाजाचे काही नाही का?”

"माझ्याकडे ‘हॉर्न’ (तुतारीसारखे वाद्य) आहे," ट्रिल्स म्हणाला.

“मी ते वाजवून बघतो.”

ट्रिल्सने त्याला एक मोठे पितळी वाद्य दिले. डन्नोने पूर्ण ताकदीने फुंकले आणि त्यातून एक कर्कश आवाज बाहेर पडला.

“हे एक चांगलं वाद्य आहे," डन्नो म्हणाला. "त्यातून खूप आवाज येतो."

‘‘ठीक आहे, तुझी इच्छा असेल तर हॉर्न वाजवायला शिक.’’

"मी का शिकू?" डन्नो म्हणाला. "मला न शिकताही येतं."

"नाही, तुला माहीत नाही," ट्रिल्स म्हणाला.

“हो, मला माहीत आहे! ऐका!” आणि त्याने पूर्ण ताकदीने वाद्य वाजवले: बू-ऊ-म! बा-आम!

"तू नुसतंच फुंकतो आहेस. तू वाजवत नाहीयेस," ट्रिल्स म्हणाला.

“वाजवत नाहीये?" डन्नो रागाने म्हणाला. "मी खूप छान वाजवतोय. मी मोठा आवाज काढतोय.."

“तुला आवाज करायचा नाही, तुला संगीत निर्माण करायचे आहे.”

“हे संगीत आहे.”

“नाही, तसं नाहीये,” ट्रिल्स म्हणाला. “मला दिसतंय की तुला संगीताची जाण नाही.”

“तुला स्वतःला कान नाही,” डन्नो रागाने म्हणाला.

“तुला मत्सर वाटतोय, बस्स. तुला जी प्रशंसा इतकी आवडते, त्यातला काही भाग दुसऱ्या कोणाला तरी मिळेल याची तुला भीती वाटते.”

“ते खरं नाही,” ट्रिल्स म्हणाला. “जर तुला वाटत असेल की शिकण्याची गरज नाही, तर हॉर्न घे आणि तुला पाहिजे तितकं वाजव. मग बघूया लोक तुझी कशी प्रशंसा करतात!”

"मी तेच करीन," डन्नो म्हणाला.

आणि त्याने वाद्य घेतले आणि वाजवायला सुरुवात केली. त्याला कसे वाजवायचे हे माहीत नसल्यामुळे, ते वाद्य कर्कश आवाज करत, खोकत आणि धापा टाकत होते. जेव्हा ट्रिल्सला ते आणखी सहन झाले नाही, तेव्हा त्याने आपले मखमली जाकीट आणि टायऐवजी लावलेला गुलाबी बो घातला, आणि तो एका मित्राला भेटायला गेला.

त्या संध्याकाळी, जेव्हा सगळे घरी होते, तेव्हा डन्नोने वाद्य बाहेर काढले आणि ते पुन्हा वाजवायला सुरुवात केली.

धूम-धूम-धूम-धूम!

“हा कसला आवाज आहे?" घरातले ओरडले.

"हा आवाज नाही," डन्नो म्हणाला, "हे मी वाजवत आहे."

"आत्ताच्या आत्ता ते टाकून दे, त्यामुळे माझ्या डोक्यात दुखायला लागतं.“ घरचे म्हणाले.

“तुम्हाला त्याची सवय नसल्यामुळेच असे होत आहे. एकदा सवय झाली की त्यामुळे डोकेदुखी होणार नाही.”

“पण आम्हाला त्याची सवय करून घ्यायची नाही.”

पण डन्नो फुंकतच राहिला.

बूम-बूम - गिर्र-गिर्र - बूम-बूम!

"थांबवा ते!" सर्व माइट्स ओरडले. "तुझं ते भयंकर वाद्य घेऊन इथून चालता हो!"

"मी कुठे जाऊ?"

"बाहेर मैदानात जाऊन तिथे वाजव."

"तिथे माझं कोणी ऐकणार नाही."

"तुला तुझे वादन कोणीतरी ऐकावं वाटतंय का?"

"अर्थातच," डन्नो म्हणाला.

"मग बाहेर जाऊन शेजाऱ्यांसोबत खेळा."

डुन्नो बाहेर गेला आणि शेजारच्या घरासमोर हॉर्न वाजवू लागला. शेजारी बाहेर आले आणि त्यांनी त्याला एवढा आवाज न करण्यास सांगितले. तो दुसऱ्या घरात गेला, पण तिथूनही त्याला हाकलून देण्यात आले.

जेव्हा तिसऱ्या घरीही तेच घडले, तेव्हा त्याने केवळ सूड म्हणून आपल्या पूर्ण ताकदीने वाद्य वाजवले. यामुळे सर्व लोक संतापले. ते आपापल्या घरातून धावत बाहेर आले आणि त्यांनी त्याला हाकलून दिले. आपले वाद्य घेऊन त्यांच्या तावडीतून निसटणे हेच त्याच्यासाठी मोठे आव्हान होते. आणि तेव्हापासून त्याने ते वाजवलेले नाही.

"माझ्या संगीताची कदर कोणी करत नाही," तो म्हणाला. "ते अजून त्या पातळीपर्यंत पोहोचलेले नाहीत. जेव्हा ते मोठे होतील, तेव्हा त्यांना ते ऐकायला आवडेल, पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असेल. मी त्यांच्यासाठी वाजवणार नाही."